स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/२९० दि. १३/१०/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करून नशामुक्त भारत अभियानातंर्गत 'नशामुक्त मित्र' नियुक्त करण्याबाबत...

संदर्भ : मा.डॉ. सुनील भोकरे, भा.प्र.से., आयुक्त, शहरी आरोग्य तथा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुबंई यांचे दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, जनजागृती तसेच युवकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी युवकांचा सक्रिय सहभाग महत्त्वपूर्ण आहे. त्यानुषंगाने युवक व किशोरवयीन गटांचा म्हणून सक्रिय सहभाग घेऊन अमली पदार्थांच्या वापरास प्रतिबंध, व्यसनमुक्ती, आरोग्यविषयक जनजागृती तसेच तसेच आवश्यक शासकीय सेवा व सुविधांबाबत माहिती समाजापर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयांमध्ये रासेयो स्वयंसेवकांमार्फत सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करून सदर उपक्रम यशस्वी करण्याकरिता आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे.

तसेच याबाबतची माहिती BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **'नशा मुक्त भारत अभियान'** या विषयाची निवड करून सादर करणे अनिवार्य आहे. **अहवाल सादर करताना 'संक्षिप्त अहवाल/अभिप्राय/टिपणी/प्रतिक्रीया' याठिकाणी सदर उपक्रमाकरिता सहभागी विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी.** कळावे, ही विनंती.

संचालक(अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

MSACS

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
(महाराष्ट्र शासन)
आर.ए.किडवाई मार्ग, ॲकवर्थ लेप्रसी कॉम्पलेक्स,
वडाळा(प.) मुंबई-४०००३१

जा.क्र.मराएनिसं/माशिसं/आरआॅरसी/ नशामुक्त भारत अभियान /२६-२७ /7064
दिनांक-30 /09 /२०२६

प्रति,

राज्य संपर्क अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस),
महाराष्ट्र राज्य.

विषय : राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) संलग्न सर्व महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब (RRC) स्थापन करून नशामुक्त भारत अभियान (Nasha Mukt Bharat Abhiyaan- NMBA) अंतर्गत "नशामुक्त मित्र" (Nasha Mukt Mitra) नियुक्त करण्याबाबत..

संदर्भ : राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना (NACO), आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक १२ सप्टेंबर २०२६ रोजीचे पत्र.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, जनजागृती तसेच युवकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी युवकांचा सक्रिय सहभाग महत्त्वपूर्ण आहे.
या अनुषंगाने युवक व किशोरवयीन गटांचा म्हणून सक्रिय सहभाग घेऊन अमली पदार्थांच्या वापरास प्रतिबंध, व्यसनमुक्ती, आरोग्यविषयक जनजागृती तसेच आवश्यक शासकीय सेवा व सुविधांबाबत माहिती समाजापर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे. मार्फत राज्यातील रेड रिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) नेटवर्कच्या माध्यमातून युवकांची "नशा मुक्त मित्र" म्हणून नियुक्ती करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी स्वयंसेवक कार्यरत असून, हे स्वयंसेवक सामाजिक जनजागृती, समुदाय सहभाग आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात.

त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना चे व्यापक नेटवर्क आणि रेड रिबन क्लब यांचा समन्वय साधून युवकांना "नशामुक्त मित्र" म्हणून सहभागी करून घेणे हा या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरेल.

त्या अनुषंगाने आपल्या स्तरावरून राज्यातील संबंधित विद्यापीठे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या महाविद्यालयांना खालीलप्रमाणे आवश्यक निर्देश देण्यात यावेत :

१. राज्यातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करण्यात यावा. ज्या महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब आधीच कार्यरत आहे, ते रेड रिबन क्लब मार्फत नियमित जनजागृती उपक्रम राबविण्यात यावेत.

२. प्रत्येक राष्ट्रीय सेवा योजना युनिटने आपल्या महाविद्यालयातील रेड रिबन क्लब सोबत समन्वय साधून "नशा मुक्त भारत अभियान" अंतर्गत उपक्रम राबवावेत.

३. प्रत्येक संबंधित राष्ट्रीय सेवा योजना युनिटमधून इच्छुक व सक्रिय राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची "नशामुक्त मित्र म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

४. नियुक्त "नशामुक्त मित्र" यांना कार्य करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे.

५. रेड रिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व युवकांमध्ये अमली पदार्थांचे सेवन टाळणे, व्यसनमुक्ती, एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, आरोग्यविषयक जनजागृती करण्यात यावी.

६. राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रम, विशेष शिबिरे, ग्रामभेटी, युवक संवाद, जनजागृती रॅली, व्याख्याने, पोस्टर/निबंध स्पर्धा, प्रतिज्ञा इत्यादी उपक्रमांमध्ये "नशा मुक्त भारत अभियान" व एचआयव्ही/एड्स प्रतिबंध विषयांचा समावेश करण्यात यावा.

७. रेड रिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त माध्यमातून उपक्रम राबवून युवकांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यात यावी.

८. विद्यापीठनिहाय व महाविद्यालयनिहाय रेड रिबन क्लब स्थापनेची स्थिती तसेच "नशामुक्त मित्र" म्हणून नियुक्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची माहिती संकलित करण्यात यावी.

९. राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अनुपालन अहवाल आवश्यक माहितीसह महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेस iec_msacs@mahasacs.org हया ईमेल आयडीवर उपलब्ध करून देण्यात यावा.

त्याअनुषंगाने राज्यातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करून, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून "नशामुक्त मित्र" उपक्रम राबविण्यासाठी आपल्या स्तरावरून सर्व संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांना आवश्यक निर्देश निर्गमित करण्यात यावेत, ही विनंती.

सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, समन्वय व सहकार्य करण्यास तयार आहे.

डॉ.सुनील भोकरे, भा.प्र.से
आयुक्त, शहरी आरोग्य तथा प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई

प्रत माहितीस्तव :

१. क्षेत्रिय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, रासेयो क्षेत्रिय संचलनालय (महाराष्ट्र व गोवा), पुणे
२. कार्यक्रम समन्वयक तथा संचालक (रासेयो), सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य